# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## क क्षेत्रीय कार्यालय

## कार्यपत्रिका क्रमांक-१२

## सभावृत्तांत

दि.- ०४/३/२०१५ वेळ -दुपारी १२:०० वाजता

------------------- ---------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय समितीची मासिक सभा बुधवार दि.०४/३/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.जम सोनाली पोपट सभापती

२) मा.ननवरे जितेंद्र बाबा

३) मा.भोसले राहूल हनुमंतराव

४) मा.पालांडे सुजाता सुनिल

५) मा.सौ.पानसरे अमिना महंमद

६) मा.कदम सदगुरु महादेव

७) मा.गिता सुशिल मंचरकर

८) मा.कैलास महादेव कदम

९) मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०)मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११)मा.मोटे किरण बाळासाहेब

१२)मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.तांबे- कार्यकारी अभियंता पापू, मा.मकरंद निकम- कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.संजय खाबडे-कार्यकारी अभियंता (विदयुत), मा.गटटुरवार- कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.जावळे- उपअभियंता पापु,मा.सोनवणे-उपअभियंता,विदयुत, विदयुत,श्री.शिंदे- उपअभियंता, स्थापत्य, श्रीमती अनघा पाठक- उपअभियंता जलनि:स्सारण, मा.शिंदे- उपअभियंता स्थापत्य , मा.उगले-लेखाधिकारी,मा.संजय घुबे- उपअभियंता श्री.रमेश भोसले- मुख्य आरोग्य निरीक्षक,श्री.नाना मोरे- कार्यालयीन अधिक्षक, श्री.पन्हाळे-अतिक्रमण निरीक्षक हे अधिकारी उपस्थित होते.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-१ ) नामकरण करणेबाबत- मा.संजय काटे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमंक-२) प्रभाग क्र.३७ मधील सार्वजनिक शौचालय मुतारी व आरोग्य कार्यालय काढणेबाबत-मा.जितेंद्र ननावरे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) अतिक्रमण कार्यवाही सक्षम करणेसाठी आवश्यक तेवढे कर्मचारी देणेबाबत-मा.जितेंद्र ननावरे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

-----

दि.४/२/२०१५ ( दुपारी १२.०० वा.) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक - १०७ विषय क्रमांक-१

दिनांक ४/३/२०१५ विभाग-

सुचक-मा. संजय काटे अनुमोदक -मा. सदगुरु कदम

संदर्भ- मा.संजय काटे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग ६४ मधील दापोडी भागातील सिध्दार्थनगर झोपडपट्टीतील "आनंद डिपार्टमेंट स्टोअर ते जयहिंद बालवाडी" या गल्लीस **"कै.पवनभाऊ काटे पथ"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - १०८ विषय क्रमांक-२

दिनांक ४/३/२०१५ विभाग-

सुचक-मा. जितेंद्र ननावरे अनुमोदक -मा. सदगुरु कदम

संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३७ मधील महात्मा फुलेनगर समोरील रस्ता रुंदीकरणात अडथळा असणारे सार्वजनिक शौचालय मुतारी व मनपाचे आरोग्य कार्यालय काढणेत यावेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - १०९ विषय क्रमांक-३

दिनांक ४/३/२०१५ विभाग-

सुचक-मा. जितेंद्र ननावरे अनुमोदक -मा. सदगुरु कदम

संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

क क्षेत्रीय कार्यालय व मनपा हद्दीमधील सर्व तात्काळ पथारीवाले व हातगाडीवाले बॅनर्स हटविणेसाठी खालील कर्मचारी मिळावेत.

१) २ ड्रायव्हर २) २ अतिक्रमण निरीक्षक + १ सुट्टी सोडविणेकरिता एक अतिक्रमण निरीक्षक ३) १० मजुर ४) ४ पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी.

वरील कर्मचारी मिळावेत व सदरचे कामकाज इतर महानगरपालिकेप्रमाणे २ शिफटमध्ये करावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-

(जम सोनाली पोपट)

सभापती

क क्षेत्रीय समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६

जा.क्र.कक्षेका/कावि/२२/२०१५

दि. ५ /३/२०१५



प्रशासन अधिकारी तथा

सचिव (सभाशाखा)

क क्षेत्रीय समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.